महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.०१-ब/६८६२
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक : २२.०३.२०२२**

# परिपत्रक

**विषय:- अतिदुरच्या स्थानकावरुन बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयात येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळेत सवलत देण्याबाबत.**

**संदर्भ:-** १) सामान्य आदेश क्र.१४५ (क) दि.०६.०५.१९९७.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.२५६ दि.१५.०१९९८.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.५१७ दि.०४.०९.२०१५
४) दुरूस्ती चिठ्ठी क्र. ४९ दि. २७.०२.२०२०
५) शासन परिपत्रक क्र.समय-२०१८/प्र.क्र.१०२/१८ (रवका) दि.२८.१२.२०२१

महाराष्ट्र शासना तर्फे वेळोवळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांच्या धर्तीवर महावितरण कंपनीमधील बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयामधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी जे नाशिक व पुणे येथून प्रवास करीत आहेत अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या संबधित कार्यालयीन वेळेच्या उपस्थितीमध्ये तात्कालीन वीज मंडळात संदर्भ क्र. १ व २ अन्वये सुट देण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त तरतुदींच्या अनुषंगाने कंपनी अंतर्गत अतिदुरच्या स्थानकावरुन बृहन्मुंबई मधील कार्यालयामध्ये येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना संदर्भ क्र. ३ अन्वये बायोमॅट्रीक प्रणालीद्वारे कार्यालयीन उपस्थितीमध्ये सुट देण्यात आली आहे. दुरूस्ती चिठ्ठी क्र. ४९ दि. २७.०२.२०२० अन्वये ५ दिवसांचा आठवडा झाल्याने प्रशासकीय कार्यालयाच्या कार्यालयीन वेळेत बदल करून नविन वेळेच्या सुचना निर्गमित केल्या आहेत.

३. आता, सदंर्भीत शासन परिपत्रक दि.२८.१२.२०२१ अन्वये अतिदुरच्या स्थानकावरुन बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयात येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यालयीन उपस्थितीच्या वेळेत सवलत देण्याबाबतच्या सुधारीत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या धर्तीवर सक्षम अधिकारी यांनी खालीलप्रमाणे सदर सुचना कंपनी अंतर्गत अंगिकृत करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

क) मध्य रेल्वेच्या "कर्जत" स्थानकापलीकडील "पुणे" स्थानकापर्यंतच्या स्थानकांवरुन तसेच "कसारा" स्थानकाकडील "नाशिक" पर्यंतच्या स्थानकावरुन बृहन्मुंबईतील कंपनीच्या कार्यालयात येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सकाळी ५० मिनिटे म्हणजेच सकाळी १०.५० वा.पर्यंत उशिरा येण्याची तसेच पश्चिम रेल्वेच्या विरार स्थानकापलीकडील डहाणू स्थानकापर्यंतच्या स्थानकांहून बृहन्मुंबईतील कार्यालयांत दररोज येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सायंकाळी कार्यालयीन वेळेमध्ये ५० मिनिटांची म्हणजेच सायंकाळी ५.२५ वाजता कार्यालय सोडण्याची विशेष सवलत खालील अटींच्या अधीन राहून देण्यात आलेली आहे.

अ) उशिरा येण्याच्या/सायंकाळी लवकर कार्यालय सोडण्याच्या बदल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दरवर्षी १५ दिवसांची अर्जित रजा कंपनीस समर्पित कराव्यात व तसे वर्षाच्या सुरुवातीला लेखी द्यावे.

आ) उक्त सवलत प्राप्त होणाऱ्या कर्जत-पुणे तसेच कसारा-नाशिक येथून प्रवास करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना संध्याकाळी कार्यालय लवकर सोडण्याची परवानगी अनुज्ञेय असणार नाही.

इ) उक्त सवलत मंजूर करण्यापूर्वी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या, कार्यालयात उशिरा येण्यामुळे / कार्यालय लवकर सोडण्यामुळे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विभाग/कार्यालय प्रमुख यांची राहील.

ई) ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या निवासस्थानासाठी अर्ज केले असून निवासस्थान उपलब्ध होऊ शकले नाही, अशाच अधिकारी व कर्मचाऱ्यांना उक्त सवलत लागू राहील.

उ) प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याच्या बाबतीत सवलत देण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार हे कार्यालय प्रमुखांना असतील व ही सवलत, हक्क म्हणून मानण्यात येणार नाही.

ख) "नाशिक" येथून बृहन्मुंबईतील कार्यालयात येणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यापैकी दररोजची सवलत घेऊ इच्छित नसलेल्या तथापि सार्वजनिक/साप्ताहिक सुटीच्या दुसऱ्या दिवशी कार्यालयात २ तास उशिरा येण्याची सवलत घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना सामान्य आदेश क्र.१४५ (क) दि.०६.०५.१९९७ मधील मुद्दा क्र. (b) (ii) नुसार कंपनीस समर्पित करावयाच्या रजेच्या तरतुदीमध्ये बदल करून सदर कर्मचाऱ्यांनी दरवर्षी ८ अर्जित रजा कंपनीस समर्पित करणे आवश्यक राहील.

४. उपरोक्त सवलतीचा लाभ घेण्यास ईच्छुक कर्मचाऱ्यांनी कंपनीस समर्पित करावयाच्या रजा प्रतिवर्षी माहे - जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात Employee Portal मार्फत सादर करण्यात याव्यात. सन २०२२ साठी सदर सवलत दि. ०१.०४.२०२२ पासुन कंपनीत लागु होईल व उरवरींत वर्षाकरीता योग्य प्रमाणबध्द (Proportionate) रजा कंपनीस समर्पित कराव्या लागतील. तसेच, चालु वर्षात सदर सवलत घेतांना अधिकारी व कर्मचारी यांची बदली/ बढती/ सेवासमाप्ती/ बडतर्फी /मृत्यु /राजीनामा देणे अश्या कोणत्याही प्रकरणी कंपनीच्या कार्यालयात बदल अथवा सेवा समाप्त झाल्यास चालु वर्षातील उर्वरीत कालावधी साठीची रजा कर्मचाऱ्याच्या खात्यात जमा करावी. एका महिण्यासाठी समर्पित करायची रजा किमान १.२५ इतक्याच मर्यादेत असेल.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत:- शासन निर्णय दि.२८.१२.२०२१.

(अ.म. भादीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना:**
१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

अतिदूरच्या स्थानकांवरून बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांत येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना वेळेत सवलत देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : समय-२०१८ / प्र. क्र. १०२ / १८(र.वका.)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२,
दिनांक : २८ डिसेंबर, २०२१.

वाचा:-

१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-१०९३ / प्र. क्र. ३८ / ९३ / १८ (र.वका.), दिनांक १५ ऑक्टोबर, १९९३.
२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-१०९६ / प्र. क्र. २२४ / ९६ / १८ (र.वका.), दिनांक २९ ऑगस्ट, १९९६.
३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-१०९९ / प्र. क्र. १६ / ९९ / १८ (र.वका.), दिनांक ३० मार्च, १९९९.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०१६ / प्र. क्र. ६२ / १८ (र.वका.), दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०.

प्रस्तावना :-

उपरोक्त दिनांक १५ ऑक्टोबर, १९९३ च्या परिपत्रकान्वये, मध्य रेल्वेच्या "कर्जत" स्थानकापासून "पुणे" स्थानकापर्यंतच्या स्थानकांवरून दररोज तसेच दिनांक २९ ऑगस्ट, १९९६ व दिनांक ३० मार्च, १९९९ च्या परिपत्रकान्वये "नाशिक" येथून सार्वजनिक / साप्ताहिक सुटीच्या दुसऱ्या दिवशी बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांत येणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना नैमित्तिक / अर्जित रजा शासनास समर्पित करण्याच्या अटीवर सकाळी वेळेमध्ये सवलत प्रदान करण्यात आलेली आहे.

२. "नाशिक" येथून दररोज बृहन्मुंबईत येण्यासाठी उपलब्ध असलेली रेल्वे सुविधा तसेच पुणे / नाशिक येथून येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेला सवलतीचा कालावधी व त्याबदल्यात समर्पित करावयाच्या रजा यांचा सांगोपांग विचार करून याबाबत सदर सवलतींचे पुनर्विलोकन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचप्रमाणे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० च्या शासन निर्णयान्वये कार्यालयीन वेळ सायंकाळी ६.१५ वा. पर्यंत वाढविण्यात आल्याने त्यानंतर पश्चिम रेल्वेच्या विरार स्थानकापलीकडील डहाणूपर्यंतच्या स्थानकांवरून येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना उपलब्ध असलेल्या रेल्वे सुविधांचा विचार करून यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

**शासन परिपत्रक :-**

मध्य रेल्वेच्या "कर्जत" स्थानकापलीकडील "पुणे" स्थानकापर्यंतच्या स्थानकांवरून तसेच "कसारा" स्थानकापलीकडील "नाशिक" पर्यंतच्या स्थानकांवरून बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांत येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सकाळी ५० मिनिटे म्हणजेच सकाळी १०.३५ वा. पर्यंत उशिरा येण्याची तसेच पश्चिम रेल्वेच्या विरार स्थानकापलीकडील डहाणू स्थानकापर्यंतच्या स्थानकांहून बृहन्मुंबईतील कार्यालयांत दररोज येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सायंकाळी कार्यालयीन वेळेमध्ये ५० मिनिटांची म्हणजेच सायंकाळी ५.२५ वाजता कार्यालय सोडण्याची विशेष सवलत खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

अ) उशिरा येण्याच्या / सायंकाळी लवकर कार्यालय सोडण्याच्या बदल्यात संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांनी दरवर्षी १५ दिवसांची अर्जित रजा शासनास समर्पित करावयात व तसे वर्षाच्या सुरुवातीला लेखी द्यावे.

आ) उक्त सवलत प्राप्त होणाऱ्या कर्जत-पुणे तसेच कसारा-नाशिक येथून प्रवास करणा-या अधिकारी / कर्मचाऱ्यांना संध्याकाळी कार्यालय लवकर सोडण्याची परवानगी अनुज्ञेय असणार नाही.

इ) उक्त सवलत मंजूर करण्यापूर्वी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या, कार्यालयात उशिरा येण्यामुळे / कार्यालय लवकर सोडण्यामुळे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विभाग / कार्यालयाच्या आस्थापना शाखेची राहील.

ई) ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थानासाठी अर्ज केले असून निवासस्थान उपलब्ध होऊ शकले नाही, अशाच अधिकारी / कर्मचाऱ्यांना उक्त सवलत लागू राहील.

उ) प्रत्येक अधिकारी / कर्मचाऱ्याच्या बाबतीत सवलत देण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार हे कार्यालय प्रमुखांना असतील व ही सवलत, हक्क म्हणून मानण्यात येणार नाही.

२. "नाशिक" येथून बृहन्मुंबईतील कार्यालयांत येणारे अधिकारी / कर्मचारी यांच्यापैकी दररोजची सवलत घेऊ इच्छित नसलेल्या तथापि सार्वजनिक / साप्ताहिक सुटीच्या दुसऱ्या दिवशी कार्यालयात २ तास उशिरा येण्याची सवलत घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना दिनांक २९ ऑगस्ट, १९९६ च्या परिपत्रकान्वये (सदर परिपत्रकातील अटींच्या अधीन राहून) देण्यात आलेली सवलत कायम ठेवण्यात आली आहे. तथापि त्याबदल्यात त्यांनी दरवर्षी ८ अर्जित रजा शासनास समर्पित करणे आवश्यक राहील.